# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## ॲडव्हान्टेज विदर्भ 2026 मध्ये महा मेट्रो कडून केअर ग्रुपला 350+ खाटांच्या रुग्णालयासाठी 'लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स'



नागपूर ०७ : महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो) यांनी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर 350 पेक्षा अधिक खाटांचे मल्टी स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी क्वालिटी केअर इंडिया लिमिटेड (QCIL) उर्फ केअर ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स यांना आज 'लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स' (Letter of Acceptance – LoA) केले.

'लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स' ॲडव्हान्टेज विदर्भ 2026 – खासदार औद्योगिक महोत्सव या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी देण्यात आले. सदर कार्यक्रम असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (AID) यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रावण हर्डीकर यांनी केअर ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पवन कुमार यांना लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स' सुपूर्द केले. या प्रसंगी महा मेट्रोचे संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री अनिलकुमार कोकाटे तसेच महा मेट्रोचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सदर लेटर ऑफ ॲक्सेप्टन्समुळे महा मेट्रो नागपूरसाठी नॉन-फेअर बॉक्स रेव्हेन्यू विभागात महत्त्वपूर्ण प्रगती साध्य झाली आहे. प्रस्तावित मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाची उभारणी कस्तुरचंद पार्क मेट्रो स्थानकाजवळील महा मेट्रोच्या भूखंडावर करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ₹600 कोटींपेक्षा अधिक खासगी गुंतवणूक अपेक्षित असून, नागपूर शहरात अंदाजे 1,500 ते 1,800 थेट रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

क्वालिटी केअर इंडिया लिमिटेड यांनी सादर केलेल्या सर्वाधिक यशस्वी प्रस्तावाच्या आधारे हा प्रकल्प अंतिम करण्यात आला आहे. प्रकल्प क्षेत्रफळ 7,202 चौ. मीटर असून, सुमारे 3.5 लाख चौ. फूटांपेक्षा अधिक बांधकाम क्षमता उपलब्ध आहे. पायाभूत सुविधा व पार्किंग व्यवस्था महा मेट्रोने आधीच विकसित केल्याने, सदर रुग्णालयाचे बांधकाम तीन वर्षांच्या कालावधीत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

क्वालिटी केअर इंडिया लिमिटेड (केअर हॉस्पिटल्स) ही 1997 मध्ये स्थापन झालेली अग्रगण्य मल्टी स्पेशालिटी आरोग्यसेवा संस्था असून, हैदराबाद येथे तिचे मुख्यालय आहे. सध्या ही संस्था देशातील 6 राज्यांतील 7 शहरांमध्ये 16 रुग्णालयांमार्फत आरोग्य सेवा पुरवित असून, 3,000 पेक्षा अधिक खाटांची सुविधा उपलब्ध आहे.